# SPANDAN CAREER INSTITUTE

THE WAY OF SUCCESS…

**A**

**प्रश्नपुस्तिका क्र.**

**BOOKLET No.** **GS2021**

**Total Que. : 100**
**Marks : 100**
**Time : 60 min**

**Mob. No. 9923262977**

**Date :06/04/2021**


**संयुक्त (पूर्व) सराव परिक्षा - 2021**

**विषय : — सामान्य अध्ययन [005]**

**पेपर क्र. (५)**

**सूचना**

१. सदर प्रश्नपुस्तिकेत १०० अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरूवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका पर्यवेक्षकाकडून लगेच बदलू




२. आपला परीक्षा—क्रमांक हया चौकोनांत न विसरता बॉलपेनने लिहावा.

३. वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे न विसरता नमूद करावा.

४. अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला ४ पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना १,२,३ आणि ४ असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवर सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करतांना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी.

५. सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. अशा प्रकारे प्रश्न सोडविणे सोयीस्कर आहे; पण एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे. अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नाकडे परतणे सोईस्कर ठरेल.

६. उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

७. प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरापैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या **प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी एक चतुर्थांश गुण वजा करण्यात येतील**.

**Note : Test Series Paper Online available**

**Visit us**

www.spandancareers.org

१. कोणत्या पद्धतीत शासकीय अधिकारी सरळ शेतकऱ्यांकडून जमीन महसूल वसूल करीत असे ?
१) कायमधारा २) रयतवारी ३) महालवारी ४) वायदा

२. आर्य समाजाचे घोष वाक्य कोणते ?
१) उपनिषदांकडे परत २) वेदांकडे परत चला
३) पुराणांकडे परत चला ४) स्मृतीकडे परत चला

३. वहाबी चळवळीचे उद्दिष्ट कोणते ?
१) मुसलमानांमध्ये शिक्षणाचा प्रसार करणे. २) जगातील सर्व मुसलमानाचे एकत्रीकरण करणे.
३) हिंदूंना विरोध करणे. ४) मुसलमानांचे राज्य स्थापन करणे.

४. उमाजी नाईक यांच्या संदर्भात योग्य विधान कोणते ?
अ) उमाजी नाईक यांनी पुणे परिसरातील रामोशांना संघटीत करून ब्रिटीश विरूद्ध बंड पुकारले.
ब) उमाजी नाईक यास पकडून देणाऱ्यास ५ हजाराचे बक्षीस ठेवण्यास आले होते.
क) त्याने १९२४ साली भांबुर्ड्यांचा लष्करी खजिना लुटला.
१) अ व ब योग्य २) ब व क योग्य
३) अ व क योग्य ४) वरीलपैकी सर्व योग्य

५. सायमन कमिशनवर भारतीय जनतेने बहिष्कार घातला कारण ..........
१) कमिशनची नेमणूक उशिरा झाली. २) यात एकही भारतीय प्रतिनिधी नव्हता.
३) कमिशनची नियुक्ती बेकायदेशीर होती. ४) गांधीजींना अटक करण्यात आली.

६. अचूक कालक्रम लावा.
अ) गदर पार्टीची स्थापना ब) चौरीचौरा घटना
क) खुदीराम बोसची फाशी ड) मलबारमध्ये मोपला बंड
१) अ, ब, क, ड २) ब, अ, ड, क ३) क, ड अ, ब ४) क, अ, ड, ब

७. भारताच्या स्वातंत्र्यापूर्वी कोणत्या घटनांनी जनमाणसाचे मत इंग्रजांविरूद्ध जागृत करण्यात आले होते?
१) नीळे संबंधित उठाव इ.स. १८५९ –६० २) कुकी येथील उठाव इ.स. १८६०–९०
३) पावना येथील शेतकरी उठाव इ.स. १८७२ –७३ ४) वरील तिन्ही उठाव

८. 'लक्ष्मीदान' हा ग्रंथ पुढीलपैकी कोणाचा आहे ?
१) रामकृष्ण विश्वनाथ २) पृथ्वीशचंद्र रॉय ३) गोपाळहरी देशमुख ४) पांडूरंग तर्खडकर

९. पुढील विधान कोणत्या ब्रिटीश गव्हर्नर जनरलेचे आहे ?
विधान : ''भारत हा आपल्या साम्राज्याच्या केंद्रबिंदू आहे. परंतु भारत गमावला तर आपल्या साम्राज्याचा सुर्य मावळलेला असेल''
१) लॉर्ड डलहौसी २) लॉर्ड विल्यम बेंटीक ३) लॉर्ड कर्झन ४) लॉर्ड क्लाईव्ह

१०. .......... यांच्या मते, ''आर्थिक नि:सारणामुळे सर्वात समृद्ध देशाला गरीब व पुर्वीपेक्षा अधिक व्यापक वाईट व नेहमी येणाऱ्या दुष्काळाची भुमी बनविले''
१) दादाभाई नौरोजी २) आनंद चार्लु ३) रमेशचंद्र दत्त ४) पृथ्वीशचंद्र रॉय

११. ब्रिटीशांच्या भारतातील प्रांतीक प्रशासनाबाबत पुढीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ?
अ) १९०५ साली बंगाल प्रांताची फेररचना करण्यात आली.
ब) अयोध्या व वायव्य प्रांताचे एकत्रीकरण करण्यात आले.
क) १८६१ मध्ये मध्यप्रांत तयार करण्यात आला.
ड) ब्रिटीशांनी १८५६ मध्ये. अयोध्या प्रांतावर आलेले वर्चस्व प्रस्थापित केले.
इ) प्रांतिक सनदी सेवा ब्रिटीशांनी भारतात लागू केली.
फ) बिटीशांना प्रांतिक प्रशासन जनताभिमुख करायचे होते.
१) अ, ब, क बरोबर
२) अ, ब, क, फ चूक
३) अ, ब, क, ड, फ बरोबर
४) वरील सर्व बरोबर

www.spandancareers.org

**१२.** इ.स. १८५८ नंतर ब्रिटीश शासनाने ...... अशा लष्कराच्या दोन पलटनी नव्याने निर्माण केल्या.

१) शाही इंजिनिअर्स व हॉटसन पलटन २) शाही सशस्त्र पलटन व शाही इंजिनिअर्सस पलटन

३) शाही हॉटसन व शाही इंटरनॅशनल पलटन ४) इंडियन पलटन व शाही इंजिनिअर्स पलटन

---

**१३.** बक्सारच्या लढाईत इंग्रजा विरूद्ध पुढील कोणत्या राजांमध्ये युती झाली ?

अ) सिराजउद्दौला ब) शुजाउद्दौला क) मीर कासीम

ड) मीर जाफर इ) शहाआलम दुसरा फ) फरूखशियर

१) अ, ब, क २) ब, क, इ ३) ब, क, फ ४) अ, ब, ड

---

**१४.** इंग्रजांनी मद्रासमधील वखार येथे बांधलेल्या किल्ल्यामुळे कोणत्या नावाने प्रसिद्ध होती ?

१) फोर्ट विल्यम जॉर्ज २) फोर्ट जॉर्ज ३) फोर्ट सेंट जॉर्ज ४) जॉर्ज सेंट फोर्ट

---

**१५.** खालील विधाने लक्षात घ्या.

कथन १) नद्यांच्या अपक्षरण कार्यामुळे सह्याद्री पर्वत रांगांची सलगता खंडीत झालेली आढळते.

कारण २) नद्यांच्या अपक्षरण कार्यामुळे जलविभाजक स्थान बदलले जाते.

१) १ व २ दोन्ही बरोबर असून २ हे १ चे योग्य कारण आहे.

२) १ व २ दोन्ही बरोबर असून २ हे १ चे योग्य कारण नाही.

३) १ व २ दोन्ही चूक

४) १ बरोबर, २ चूक

---

**१६.** खालील विधाने लक्षात घ्या व सत्य कथने निवडा.

अ) महाराष्ट्राच्या उत्तर सीमेवर सातपुडा रांगा (पुर्व–पश्चिम) पसरलेली आहे.

ब) सातपुडा पर्वतरांगेमुळे नर्मदा व तापी नदीचे खोरे अलग झालेले आहे.

क) अस्तंभा हे (१३२५ मीटर) सातपुडा पर्वतातील सर्वात उंची शिखर आहे.

ड) सातपुडा पर्वताच्या मध्यभागी बऱ्हाणपुर ही खिंड आहे.

१) अ, ब, क सत्य २) ब, क, ड सत्य ३) अ, ब, ड सत्य ४) वरीलपैकी सर्व

---

**१७.** खालीलपैकी कोणते विधान सत्य आहे ?

अ) नर्मदा व तापी नदीच्या दरम्यान सातपुडा पर्वत आहे.

ब) नर्मदा व तापी नदीच्या दरम्यान अजिंठा डोंगररांगा आहेत.

क) गोदावरी व भीमा नदीच्या दरम्यान सातमाळा डोंगररांगा आहेत.

ड) गोदावरी व भीमा नदीच्या दरम्यान शंभू महादेव डोंगररांगा आहेत.

१) केवळ अ २) केवळ ब ३) ब व क ४) क व ड

---

**१८.** ........ ही भीमा नदीची उपनदी आहे ?

अ) इंद्रायणी ब) मुळा–मुठा क) सीना व माण ड) नीरा व घोड

१) केवळ अ व क २) केवळ अ, ब, ड

३) अ, ब, क, ड ४) केवळ ब व क

---

**१९.** नाईल नदीबाबत योग्य विधाने ओळखा.

अ) नाईल नदी ही आफ्रिका व जगातील सर्वात लांब नदी आहे.

ब) सन १९०२ मध्ये नाईल नदीवर आश्वान धरण बांधण्यात आले.

क) या नदीला इजिप्तची देणगी म्हणतात.

ड) ही हिंदी महासागराला जाऊन मिळते.

१) अ व क २) अ, ब, क, ड ३) अ, ब, क ४) क व ड

---

**२०.** महाराष्ट्रात उष्णप्रदेशीय निम–सदाहरित वने ..... येथे आढळतात.

अ) भंडारा, चंद्रपूर व गडचिरोली

ब) अकोला, अमरावती व नागपूर

क) अहमदनगर, सोलापूर व नागपूर

ड) पश्चिम घाट प्रदेश

१) अ, ब, क २) केवळ ड ३) अ व ड ४) ब व क

---

www.spandancareers.org

**२१.** खालील विधाने लक्षात घ्या.

कथन १) महाराष्ट्रात नदी खोऱ्याच्या सखल भागात विहीरीद्वारे होणाऱ्या जलसिंचनाचे प्रमाण सर्वात जास्त आहे.

कारण २) महाराष्ट्रातील नदी – खोऱ्याच्या भागात पृष्ठीय जल उपलब्धता सर्वाधिक आहे.

१) १ व २ दोन्ही बरोबर असून २ हे १ चे योग्य कारण आहे.

२) १ व २ दोन्ही बरोबर असून २ हे १ चे योग्य कारण नाही.

३) १ व २ दोन्ही चूक

४) १ बरोबर, २ चूक

**२२.** खालीलपैकी लोहखनिजाचा कोणता प्रकार नाही ?

अ) लेमोनाईट ब) सींडेराईट क) लिग्नाईट ड) मॅग्नेटाईट इ) पीट

१) क व ड २) क व इ ३) अ, क, इ ४) ब व क

**२३.** खालील कथनातील वर्णन हे खालीलपैकी कोणत्या मृदा प्रकारचे आहे ?

अ) ग्रॅनाईट व नीस खडकांचे अपक्षय होऊन तयार झालेली मृदा

ब) फॉस्फरीक ॲसीड सेंद्रीय द्रव्ये पोटॅशचे प्रमाण अत्यल्प

क) भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली मुख्यत्वे पुर्व महाराष्ट्रात आढळते.

ड) या मृदेत भुईमुग, तांदूळ, बटाटे इत्यादी पिके घेतली जाते.

१) जाभी मृदा २) गाळाची मृदा ३) रेगुर मुद्रा ४) तांबडी–पिवळसर मृदा

**२४.** खालील विधानांचा विचार करा.

अ) गंगा नदी ही भारतातील सर्वात लांब व पवित्र नदी आहे.

ब) गंगा नदी हिमाचल प्रदेश राज्यामध्ये उत्तरकाशी जिल्ह्यात गंगोत्री हिमनदीपासून गौमुखाजवळ उगम पावते.

क) गंगानदी गंगोत्री हिमनदीपासून गौमुखाजवळ उगम पावते, तेथे ती भागीरथी या नावाने ओळखली जाते.

ड) गंगा नदी मंदाकीनी या नावाने ओळखली जाते.

१) सर्व योग्य २) अ, ब, क योग्य ३) अ व क योग्य ४) अ, ब, ड योग्य

**२५.** भारतातील लोहपोलाद प्रकल्पाविषयी चुकीची जोडी निवडा.

| लेहपोलाद प्रकल्प | राज्य |
|---|---|
| १) बर्नपुर (खासगी क्षेत्रातील) | पश्चिम बंगाल |
| २) जमशेदपुर (बोकारो) | झारखंड |
| ३) सालेम लोहपोलाद प्रकल्प | छत्तीसगड |
| ४) भद्रावती लोहपोलाद प्रकल्प | कर्नाटक |

**२६.** भारतात चतुर्भूजा महामार्गाने ....... ही चार शहरे जोडली जात आहेत.

१) मुंबई – दिल्ली – कानपुर – कोलकाता २) दिल्ली – मुंबई – भोपाळ – कोलकाता

३) दिल्ली – अहमदाबाद – मुंबई – कन्याकुमारी ४) दिल्ली – मुंबई – चेन्नई – कोलकाता

**२७.** भारतातील उत्तर मैदानी प्रदेशात रेल्वेचे दाट जात असण्याचे कारण म्हणजे ?

अ) दाट लोकसंख्या

ब) प्रवासी व मालवाहतुकीचे प्रमाण जास्त.

क) मंद उताराचा प्रदेश

१) फक्त अ २) फक्त क ३) ब व क ४) अ, ब, क

**२८.** खालील विधाने लक्षात घ्या.

कथन १) पृथ्वीवरील विषुववृत्तीय कमी दाबाचा पट्टा हा विषुववृत्ताच्या दोन्ही बाजुना (५° उत्तर आणि ५° दक्षिण अक्षवृत्तदरम्यान) तयार होत असतो.

कारण २) विषुववृत्तीय प्रदेशात पृथ्वीची परिवलन गती जास्त असते.

१) १ व २ दोन्ही बरोबर असून २ हे १ चे योग्य कारण आहे.

२) १ व २ दोन्ही बरोबर असून २ हे १ चे योग्य कारण नाही.

३) १ व २ दोन्ही चूक

४) १ बरोबर, २ चूक

www.spandancareers.org

**२९.** पृथ्वीवरील ध्रुवीय पुर्व वारे बाबत सत्य असणारे कथन निवडा.

अ) हे वारे ध्रुवाजवळील जास्त दाबाच्या प्रदेशाकडून ६०° अक्षवृत्तावरील कमी दाबाच्या पट्ट्याकडे वाहतात.

ब) सामान्यत: हे वारे पुर्वेकडून पश्चिमेकडे वाहतात.

क) या वाऱ्यांची वाहनाची गती जास्त असून ते नुकसानकारक ठरतात.

ड) हे वारे अतिशय थंड आणि कोरडे असतात.

१) अ व क २) अ, ब, ड ३) ब, क, ड ४) वरील सर्व

---

**३०.** खालील पर्यायातून योग्य पर्याय निवडा.

अ) संसदेच्या अधिवेशनादरम्यान एक महिन्यापूर्वी व नंतर एका महिन्यापर्यंत सदस्यांना अटक करता येत नाही.

ब) फौजदारी व प्रतिबंधात्मक स्थानबद्धतेच्या बाबतीत हा अधिकार लागू होत नाही.

१) फक्त अ २) फक्त ब ३) दोन्हीही ४) दोन्ही नाही

---

**३१.** योग्य जोड्या लावा.

| राज्य | नाव |
|---|---|
| अ) महाराष्ट्र | i) मंडल प्रजा परिषद |
| ब) आंध्रप्रदेश | ii) तालुका पंचायत |
| क) गुजरात | iii) मंडळ पंचायत |
| ड) कर्नाटक | iv) पंचायत समिती |

१) अ–iv, ब–iii, क–i, ड–ii, २) अ–iv, ब–iii, क–ii, ड–i,

३) अ–iv, ब–ii, क–i, ड–iii, ४) अ–iv, ब–i, क–ii, ड–iii,

---

**३२.** भारतीय घटनेतील विषयांची विभागणी प्रक्रिया कोणत्या प्रकारे करण्यात आली आहे ?

१) कॅनडाच्या घटनेप्रमाणे २) ऑस्ट्रेलियाच्या घटनेप्रमाणे

३) युएसए च्या घटनेप्रमाणे ४) भारतीय शासन कायदा, १९३५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे

---

**३३.** कोणत्या घटनादुरूस्तीद्वारे राष्ट्रपतीना मंत्रीपरिषदेच्या सल्ल्यानुसार वागणे बंधनकारक आहे ?

अ) ४२ वी घटनादुरूस्ती ब) ४४ वी घटनादुरूस्ती

क) २४ वी घटनादुरुस्ती ड) ५२ वी घटनादुरूस्ती

१) अ व ब २) केवळ अ ३) क व ड ४) वरीलपैकी नाही

---

**३४.** खाली १९३५ च्या कायद्याची वैशिष्ट्ये दिली आहेत. त्यापैकी चुकीचे वैशिष्ट्ये ओळखा.

अ) ब्रिटीश गव्हर्नरच्या नियंत्रणाखाली प्रांत आणि संस्थाने यांचे संघराज्य स्थापन करणे.

ब) संस्थानांना संघराज्यात सामील व्हायचे की, नाही ठरविण्याचा विकल्प देण्यात आला.

क) महत्वाचे विषय केंद्रसरकारकडे सोपवून केंद्रशासन बळकट करण्यात आले होते.

१) फक्त अ २) अ व ब ३) फक्त क ४) यापैकी नाही

---

**३५.** कॅबिनेट मिशन / त्रिमंत्री योजनेमध्ये .......... या मंत्र्यांचा समावेश होता.

अ) लॉर्ड पेथिक लॉरेन्स ब) सर स्ट्रफर्ड क्रिप्स

क) ए.व्ही. अलेक्झांडर ड) लॉर्ड लीनलीथ गो

१) अ व ब २) अ, ब, क ३) ब व क ४) ड

---

**३६.** १९७६ च्या ................. घटनादुरूस्तीनुसार प्रस्तावनेत समाजवाद आणि धर्मनिरपेक्ष हे शब्द नव्याने घालण्यात आले.

१) ४० वी घटनादुरूस्ती २) ४२ वी घटनादुरूस्ती

३) ४४ वी घटनादुरूस्ती ४) ७६ वी घटनादुरूस्ती

---

**३७.** मुलभूत हक्कांबाबत अंतिम निर्णय देण्याचा अधिकार ............. यांना आहे.

अ) राष्ट्रपती ब) पंतप्रधान क) संसद

ड) सर्वोच्च न्यायालय इ) उच्च न्यायालय फ) महान्यायवादी

१) अ व ड २) अ, ब, क ३) क, ड, इ ४) ड

---

**३८.** लोकायुक्ताची नियुक्ती करतांना बहुतेक रात्यातील राज्यपाल खालीलपैकी कोणाशी सल्लामसलत करतात ?

अ) भारताचे राष्ट्रपती ब) विधानसभेचे सभापती क) विधानसभेतील विरोधी पक्षनेते

ड) विधानपरिषद अध्यक्ष इ) उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश

१) क आणि इ २) अ आणि इ ३) ड आणि इ ४) ब व ड

---

**३९.** खालीलपैकी योग्य विधान ओळखा.

अ) विधानपरिषदेची रचना – कलम १७१ ब) राज्यपालाचे विशेष अभिभाषण – कलम १७६

क) विधानसभेचा अध्यक्ष वा उपाध्यक्ष – कलम १७८ ड) धनविदेयकाची व्याख्या – कलम १९९

१) सर्व अयोग्य २) सर्व योग्य ३) अ, क योग्य ४) क, ड योग्य

---

**४०.** महाराष्ट्रातील पंचायत राज्याचा आकृतिबंध निश्चित करण्यासाठी सर्वात प्रथम कोणती कमिटी नेमली होती ?

१) ल.ना. बोंगिरवार २) बाबुराव काळे

३) वसंतराव नाईक ४) प्राचार्य पी.बी. पाटील

---

**४१.** जिल्हा परिषदेचे अंदाजपत्रक तयार करण्याचे काम ................ करतात.

१) मुख्य कार्यकारी अधिकारी २) जिल्हा परिषद अध्यक्ष

३) जिल्हाधिकारी ४) स्थायी समिती अध्यक्ष

---

**४२.** ................ हे जिल्हा नियोजन व जिल्हा विकास मंडळाचे अध्यक्ष असतात.

१) जिल्ह्याचे पालकमंत्री २) राज्याचे अर्थमंत्री

३) राज्यपरिवहन मंत्री ४) यापैकी नाही

---

**४३.** कटक मंडळाबाबत सत्य विधाने ओळखा.

अ) राज्यामध्ये ज्या ठिकाणी लष्करी छावण्या असतात त्या नागरी भागातील कारभार कटक मंडळाच्या माध्यमातून पहिला जातो.

ब) कटकमंडळाची स्थापना १९२४ च्या कॅन्टोनमेंट बोर्ड्स ॲक्टनुसार झाली.

क) कटक मंडळावर नियंत्रण भारत सरकारच्या संरक्षण ग्रंथालयाचे थेट नियंत्रण असते.

ड) भारतामध्ये ७२ कटकमंडळे आहेत.

इ) महाराष्ट्रात ५ कटकमंडळे आहेत.

फ) छावणीचा प्रमुख लष्करी अधिकारी स्टेशन कमांडर हा कटक मंडळाचा पदसिद्ध अध्यक्ष असतो.

१) अ, क, फ २) अ, ब, क, फ ३) अ, क, इ, फ ४) अ, ड, इ

---

**४४.** खालीलपैकी सत्य विधाने विचारात घ्या.

अ) अर्धविकसितता ब) चुकीची शिक्षणपद्धती क) प्रादेशिक असमतोल

ड) मर्यादीत गुंतवणूक इ) भ्रष्टाचार व लाचलुचपत फ) निम्न जीवनमान

ज) मंद विकासदर

वरीलपैकी कोणत्या घटकाचे वर्णन दारिद्र्याचे कारण म्हणून करता येईल ?

१) अ, ब, क २) अ, ब, क, ज ३) क, ड, इ, फ, ज ४) अ, ब, ड, फ, ज

---

**४५.** खालील विधाने लक्षात घ्या.

कथन १) निरपेक्ष दारिद्र्य हे (बहुतांशी) विकसित देशात आढळत नाही.

कारण (२) विकसित देशांतील बहुतांश लोकांच्या मुलभूत गरजांची पूर्तता झालेली असते.

१) १ व २ दोन्ही बरोबर असून २ हे १ चे योग्य कारण आहे.

२) १ व २ दोन्ही बरोबर असून २ हे १ चे योग्य कारण नाही.

३) १ बरोबर २ चूक

४) १ चूक, २ बरोबर

---

**४६.** दारिद्र्याचे मुलभूत निर्देशांक म्हणून खालीलपैकी कोणत्या घटकाचे मुल्य विचारात घेता येणार नाही ?

अ) राहणीमानाची पातळी ब) दारिद्र्यरेषा क) उष्मांक पातळी

ड) दरडोई उत्पन्न इ) दरडोई उपभोग

१) अ व इ २) अ, ब, इ ३) केवळ अ ४) यापैकी नाही

---

**४७.** योग्य जोड्या लावा.

अ) प्रच्छन्न बेकारी i) काल्पनिक बेकारी

ब) घर्षणजन्य बेकारी ii) संगणक

क) ऐच्छिक बेकारी iii) शुन्य सिमांत उत्पादकता

ड) तांत्रिक बेकारी iv) तात्पुरती बेकारी

१) अ–ii, ब–iii, क–i, ड–iv, २) अ–iii, ब–iv, क–i, ड–ii,

३) अ–iii, ब–i, क–ii, ड–iv, ४) अ–ii, ब–i, क–iv, ड–iii,

---

४८. खालीलपैकी कोणते आर्थिक वृद्धाचे निर्देशक मानले जाते ?
अ) स्थूल देशांतर्गत उत्पादनातील वाढ ब) दरडोई उत्पन्नामध्ये वाढ
क) दरडोई उपभोगात वाढ ड) लोकांचा सहभाग
१) अ, ब, क २) ब, क, ड ३) ब व क ४) वरील सर्व

४९. योग्य जोड्या लावा.
अ) जागतिकीकरण i) परवानामुक्त धोरण
ब) खाजगीकरण ii) ॲडमस्मिथ
क) उदारीकरण iii) जागतिक अर्थव्यवस्थेची निर्मिती
ड) राष्ट्राची संपत्ती ग्रंथ iv) सार्वजनिक क्षेत्रातील निर्गुंतवणुक
इ) FERA कायदा v) १९७३
vi) दिपक नय्यर
१) अ–iii, ब–iv, क–i, ड–ii, इ–vi, २) अ–i, ब–ii, क–iii, ड–iv, इ–v,
३) अ–iii, ब–iv, क–i, ड–ii, इ–v, ४) अ–iii, ब–i, क–v, ड–ii, इ–vi,

५०. ११व्या पंचवार्षिक योजनेत खालीलपैकी कोणते उद्दिष्ट्य ठरविण्यात आले ते कथन निवडा.
अ) वेगवान आर्थिक वृद्धीद्वारे दारिद्र्यात घट करणे.
ब) आरोग्य आणि शिक्षण या आवश्यक सेवा विशेत्वाने गरिबांना पुरविणे.
क) प्रशासकीय सुधारणा घडवून आणणे.
ड) पर्यावरणीय निरंतर विकास करणे.
इ) स्त्री–पुरूष असमानता घटवणे.
फ) शिक्षण आणि कौशल्य विकासातून मानवी संसाधनाचे सबलीकरण करणे.
१) अ, ब, इ २) क, ड, इ, फ ३) अ, ड, इ, फ ४) वरील सर्व

५१. अधिकोष लोकायुक्त योजना (१९९५) ही कोणत्या बँकेला लागू होत नाही ?
अ) राष्ट्रीयकृत बँक ब) प्रादेशिक ग्रामीण बँक
क) खासगी क्षेत्रातील बँक ड) विदेशी बँका
१) केवळ ब २) ब व क ३) अ व ड ४) केवळ ड

५२. भारतात मध्यवर्ती बँक स्थापन करावी अशी शिफारस सर्वप्रथम कोणत्या गव्हर्नर जनरलने केली होती ?
१) लॉर्ड हेस्टिंग २) लॉर्ड रिपन ३) विल्यम बेंटीग ४) वॉरन हेस्टिंग

५३. RBI चे निरसनगृह कार्ये म्हणजे काय ?
१) आंतरबॅक व्यवहाराची पुर्तता करणे. २) मंदीच्या काळात जास्त चलननिर्मिती करणे
३) बॅकांना मार्गदर्शन सल्ला देणे ४) संकटकाळात बॅकांना मदत करणे.

५४. भारतीय रूपया चालु खात्यावर पूर्ण परिवर्तनीय कधी झाला ?
१) १९९२ २) १९९३ ३) १९९४ ४) १९९५

५५. सेबीची (SEBI) स्थापना कधी झाली ?
१) १९९२ २) २००२ ३) १९८८ ४) १९४७

५६. खालीलपैकी कोणते किंमत वाढण्याचे कारण नाही ?
१) शासकीय खर्चात वाढ २) तुटीचे अंदाजपत्रक
३) उत्पादनात वाढ ४) अतिरिक्त चलन पुरवठा

५७. रूपयाचे अवमुल्यन म्हणजे काय ?
१) भारतीय रूपया परकीय चलनाच्या तुलनेत स्वस्त करणे.
२) भारतीय रूपया परकीय चलनाच्या तुलनेत महाग करणे.
३) १ व २ दोन्ही बरोबर
४) १ व २ दोन्ही चुक

५८. सल्फर ट्रायऑक्साईडच्या उत्पादनासाठी.......... चा उत्प्रेरक म्हणून उपयोग करतात.
१) व्हॅनॅडिअम पेंट्रॉक्साईड २) मॅगनीज डायऑक्साइड
३) कॅल्शिअम कार्बोनेट ४) सिल्व्हर नायट्रेट

**५९.** आम्ली पर्जन्य पडण्यासाठी नायट्रोजनची ऑक्साईडस आणि ................. हे जबाबदार असतात.

१) कार्बनडाय ऑक्साईड २) सल्फरडाय ऑक्साईड

३) ऑक्सिजन ४) हायड्रोजन

---

**६०.** योग्य जोडया लावा.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) पेशी | | | अ) वॅटसन व कोक | |
| २) पेशीकेंद्रक | | | ब) रॉबर्ट हुक | |
| ३) तंतुकणिका | | | क) रॉबर्ट ब्राऊन | |
| ४) डि.एन.ए. | | | ड) फ्लेमिंग | |
| | | | इ) फ्रेडरीक मीरशर | |
| १) | ब | क | ड | अ |
| २) | ब | क | ड | इ |
| ३) | ब | क | इ | अ |
| ४) | इ | ब | ड | अ |

---

**६१.** सदिश राशींचे वर्णन करण्यासाठी ....................

१) फक्त दिशा पुरेशी असते २) फक्त परिमाण पुरेसे असते

३) दोन्ही परिमाण व दिशा आवश्यक असता ४) दिशा किंवा परिमाण यांपैकी कोणतेही एक पुरेसे असते.

---

**६२.** खालील विधाने लक्षात घ्या.

कथन अ) मानवी रक्तातील लोहित पेशीचे विभाजन होत नाही.

कारण ब) लोहित पेशीमध्ये केंद्रक असते.

१) अ व ब दोन्ही बरोबर असून ब हे अ चे योग्य कारण आहे.

२) अ व ब दोन्ही बरोबर असून ब हे अ चे योग्य कारण नाही.

३) अ बरोबर व ब चूक

४) अ चूक, ब बरोबर

---

**६३.** खालीलपैकी कोणत्या प्राण्याचे वर्गीकरण आपल्याला उभयलिंगी या गटात करता येणार नाही ?

अ) हायड्रा ब) लिव्हरफ्ल्युक क) गांडूळ ड) मधमाशी

१) अ व क २) क व ड ३) केवळ ड ४) ब, क, ड

---

**६४.** एका भिंगावर प्रकाशकिरण पडले असता, त्याचे विचलन होत नाही. म्हणून आपाती किरण .................... पडला असला पाहिजे.

१) वक्रता केंद्र २) प्रकाशीय केंद्रावर

३) द्वितीय नाभीय केंद्र ४) प्रकाशीय अक्षावर २F बिंदूपाशी

---

**६५.** सजीव वर्गीकरणाची अत्याधुनिक पध्दती मुख्यतः ..................... या रेणुच्या अभ्यासावर आधारित आहे.

१) DNA २) RNA ३) प्रथिन रेणु ४) वरीलपैकी सर्व

---

**६६.** खालील विधाने लक्षात घ्या व सत्य कथन निवडा.

अ) कवक या उपवर्गीतील सजीव परपोषी पध्दतीचा अवलंब करतात.

ब) काही कवक मृतोपजीवी असतात

क) कवकांची वाढ ओल्या आणि दमट ठिकाणी होते.

ड) कवक वर्गातील सजीवांचे सहजीवन परस्परपुरक असते

१) अ व ब २) केवळ ड ३) अ, ब, क ४) ब, क, ड

---

**६७.** असंवहनी वनस्पती गटात खालीलपैकी कोणत्या वनस्पती गटात समावेश होतो ?

अ) थॅलोफायटा (प्रकायोदभिदी) ब) ब्रायोफायटा (हरितोदृभिदी)

क) टेरिडोफायटा (नेचोदभिदी) ड) स्पेरमॅटोफायटा (बिजोदभिदी)

१) अ व ब २) ब व क ३) ब, क, ड ४) अ व ड

---

**६८.** खालीलपैकी वनस्पतीत आढळणारे रंगद्रव्य कोणते ?

अ) क्लोरोफील ब) ए.टी.पी. क) झॅथोफिल ४) कॅरोटिन

१) अ व ब २) ब, क, ड ३) अ, क, ड ४) केवळ अ



www.spandancareers.org

**६९.** तापमान १$^{\circ}$C ने वाढ झाल्यावन ध्वनीचा वेग .................m/s इतका वाढतो.

१) १.२ m/s  २) ०.६ m/s  ३) १० m/s  ४) २५ m/s

---

**७०.** खालील विधाने लक्षात घ्या व योग्य असणारे विधान निवडा.

अ) एखाद्या वस्तुने प्रत्यक्ष आक्रमिलेल्या दोन बिंदूमधील मार्गाची लांबी (एकूण) म्हणजे अंतर

ब) एखाद्या वस्तुने आरंभ बिदूपासून अंतिम बिंदूपर्यंत कापलेले सर्वात कमी अंतर म्हणजे विस्थापन

क) एखाद्या वस्तुने एकक वेळात कापलेले अंतर म्हणजे चाल

ड) एखाद्या वस्तुने एकक काळात विशिष्ट दिशेने कापलेले अंतर म्हणजे वेग

१) अ, ब, क  २) ब, क, ड  ३) अ, क, ड  ४) वरील सर्व

---

**७१.** ६०० मीटर अंतर ३६ सेकंदात ओलांडणाऱ्या गाडीचा ताशी वेग किती कि.मी. असेल ?

१) ५० कि.मी.  २) ७२ कि.मी.  ३) ६० कि.मी.  ४) ४५ कि.मी.

---

**७२.** एका सांकेतिक भाषेत ५७३ चा अर्थ bring cold water असा होतो. ३४२ चा अर्थ water is good असा होतो व bright good boy साठी १२६ हा संकेत वापरतात तर पुढीलपैकी boy is bright साठी खालीलपैकी संकेत कोणता ?

१) ३७१  २) ५७४  ३) ६४१  ४) ६७३

---

**७३.** खालील वर्णणावरून युध्द सराव ओळखा

अ) भारत – जपान आणि अमेरिकेचा त्रिपक्षीय युध्द सराव

ब) २०१९ साली जपान येथे आयोजन

क) १९९२ पासून भारत – अमेरिका या देन देशांमध्ये सुरूवात

ड) २०१५ मध्ये जपान या सरावात सहभागी

१) धर्मा  २) शिन्यू – मैत्री  ३) मलबार  ४) युध्द अभ्यास

---

**७४.** ऋषिकेशने एक घडयाळ ५४० रूपयाला विकले तेव्हा त्याला १०% तोटा झाला जर २०% नफा व्हावा अशी त्याची इच्छा असेल तर त्याने ते घडयाळ किती रूपयास विकावे ?

१) ५४०  २) ६८०  ३) ५२०  ४) ७२०

---

**७५.** ५ वाजल्यापासून ८ वाजेपर्यंत कोणत्यावेळी घडयाळाचे दोन्ही काटे एकावर एक येतात ?

१) ५:३० मि.  २) ५:२२ मि.  ३) ५:२२$^{८/११}$  ४) ५:२७$^{३/११}$

---

**७६.** एका स्त्रीची ओळख करून देताना दामु अण्णा म्हणाले. 'हिची आई माझ्या सासुची एकुलती एक मुलगी आहे' तर ती स्त्री दामु अण्णाची कोण ?

१) सुन  २) मुलगी  ३) बहिण  ४) भाची

---

**७७.** प्रश्नचिन्हाच्या जागी कोणती संख्या येईल ?

| | | |
|---|---|---|
| १७ | २४ | ? |
| २२ | २० | १८ |
| २१ | १६ | २३ |

१) २०  २) ३०  ३) १९  ४) २२

---

खालील विधानांवरून प्रश्नांची योग्य उत्तरे सांगा.

सहा मुले A, B, C, D, E आणि F व पाच मुली P, Q, R, S आणि T यामधून खालील अटीनुसार ६ जणांचा एक संघ निवडायचा आहे ?

१) A व D एकमेकांसोबत असतील

२) C हा S सोबत नसेल

३) S व T एकमेकासोबत असतील

४) B हा E सोबत खेळू शकत नाही

५) D हा P सोबत नसेल

६) B व R सोबत असतील

७) C व Q सोबत असतील.

**७८.** जर संघात ५ मुले असतील, तर उरलेली एकटी मुलगी कोण असेल ?

१) P  २) Q  ३) R  ४) S

www.spandancareers.org

७९. विधान : १) सर्व पेटया या बाटल्या असतात.
२) काही बाटल्या बरण्या असतात.

अनुमान :

अ) काही पेटया बरण्या असतात

ब) काही बरण्या पेटया असतात

क) काही बरण्या या बाटल्या असतात

ड) काही बाटल्या पेटया असतात

१) काही अनुमान निघत नाही २) फक्त अ व ब अनुमाने निघतात

३) फक्त ब व क अनुमाने निघतात ४) फक्त क व ड अनुमाने

---

८०. रोहन उत्तर दिशेला ३ कि.मी. चालत गेला. नंतर तो त्याच्या डावीकडे वळला आणि २ कि.मी. चालत गेला. तो पुन्हा डावीकडे वळला आणि ३ कि.मी. चालत गेला. या ठिकाणाहून तो डावीकडे वळला आणि ३ कि.मी. चालला सुरूवातीच्या ठिकाणापासून तो किती अंतरावर आहे ?

१) १ कि.मी. २) २ कि.मी. ३) ३ कि.मी. ४) ५ कि.मी.

---

८१. जर शिक्षकदिन मंगळवारी आला असेल तर त्याच वर्षी गांधी जयंती कोणत्या वारी येईल ?

१) बुधवार २) सोमवार ३) मंगळवार ४) शनिवार

---

८२. MILK :११ – ७ १० – १० – ९ : : GURC : ?

१) ७ – १२ – १८ – ३ २) ९ – २३ – २० – ५

३) ५ – १९ – १६ – १ ४) यापैकी नाही

---

८३. राज्यातील दुष्काळावर कायमस्वरूपी मात करण्यासाठी सर्व नदी खोऱ्यांचा एकात्मिक जल आराखडा तयार करणारे भारतातील पहिले राज्य कोणते ?

१) आंध्र प्रदेश २) मेघालय ३) महाराष्ट्र ४) उत्तर प्रदेश

---

८४. सहा विद्यार्थी फोटो काढण्यासाठी एका रांगेत बसलेले आहेत. K हा V आणि R यांच्यामध्ये बसलेला आहे. V हा M च्या शेजारी बसलेला आहे. M हा B च्या शेजारी बसलेला आहे. B हा डाव्या बाजूच्या टोकावर बसलेला आहे. Q हा R च्या शेजारी बसलेला आहे. तर V हा कोणत्या दोन विद्यार्थ्यांच्या मध्ये बसलेला आहे ?

१) M व R २) M व K ३) R व B ४) B व K

---

८५. P + Q म्हणजे P हा Q चा मुलगा आहे.

P – Q म्हणजे P ही Q ची मुलगी आहे.

P * Q म्हणजे P हा Q चा भाऊ आहे.

P / Q म्हणजे P ही Q ची बहीण आहे.

P = Q म्हणजे P हा Q चा पती आहे

तर पुढील M हे N चे सासरे आहेत. यासाठी कोणता नातेसंबध योग्य असेल ?

१) O = N – M २) N + O – M ३) N = O – M ४) M – O = N

---

८६. ऑगस्ट २०१९ मध्ये झालेल्या “फॉरवर्ड महाराष्ट्र – अ फ्युचर ऑफ लर्निंग समिट” या एक दिवसीय शैक्षणिक परिषदेसंबंधी खालील विधाने अभ्यासा

अ) महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळ (Mahrashtra International Education Board : MIEB) आणि फेसबुक यांच्या संयुक्त विद्यमाने या परिषदेचे आयोजन करण्यात आले होते

ब) महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण मातृभाषेतन मिळावे यासाठी स्थापन करण्यात आलेल्या एमआयआईबी मंडळांतर्गत राज्यातील आणखी १०० शाळा आणण्याचा निर्णय महाविकास आघाडीच्या सरकारने घेतला आहे

वरीलपैकी सत्य विधाने ओळखा

१) फक्त अ २) फक्त ब ३) अ, ब ४) दोन्हीही नाही

---

८७. खालील विधानांचा अभ्यास करा.

अ) केंद्रीय युवक कल्याण व क्रीडा मंत्रालयाच्या वतीने दिला जाणारा २०१८ सालचा तेनसिंग नोर्गे राष्ट्रीय साहसी पुरस्कार कर्नाटकचा जलतरणपटू प्रभात कोळी याला प्रदान करण्यात आला

ब) ट्रिपल क्राउन ऑफ ओपन वॉटर स्विमिंग स्पर्धा पूर्ण करणारा वेळी हा सर्वात तरूण भारतीय जलतरणपटू आहे

वरीलपैकी सत्य विधान/ने ओळखा

१) फक्त अ २) फक्त ब ३) अ, ब ४) दोन्हीही नाही

www.spandancareers.org

८८. रसायन उद्योगाच्या वाढीत वेग आणण्यासाठी भारतातील पहिली मध्यवर्ती रसायन अभियांत्रीकी आणि तंत्रज्ञान संस्था (Central Institute of Chemical Engineering and Technology : CICET) कोणत्या राज्यात स्थापन करण्याचा निर्णय केंद्रीय रसायन खते मंत्रालयाने घेतला आहे ?

१) महाराष्ट्र २) गुजरात ३) पंजाब ४) आसाम

८९. उदय एक्सप्रेस (UDAY Express) विषयी खालीलपैकी अयोग्य विधान निवडा

१) डी डबल डेकर वातानुकुलित ट्रेन आहे

२) पहिली उदय एक्सप्रेस कोईम्बतुर ते बंगळुरू रेल्वे मार्गावर सुरू करण्यात आली होती

३) द्वितीय उदय एक्सप्रेस विशाखापट्टणम ते रामेश्वरम या मार्गावर सुरू केली जाणार आहे

४) कोणतेही नाही

९०. योग्य जोडया लावा

| (उत्पादन जीआय टॅग) | (राज्य) |
|---|---|
| १) श्रीविलिपुत्तर पाल्कोवा | अ) कर्नाटक |
| २) तीरूर विडयाचे पान | ब) मिझोरम |
| ३) ताव्लहलोहपुअन कापड | क) तामिळनाडू |
| ४) कोल्हापुरी चप्पल | ड) केरळ |

पर्यायी उत्तरे :

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | ब | ड | अ | क |
| २) | ब | क | ड | अ |
| ३) | क | ब | ड | अ |
| ४) | क | ड | ब | अ |

९१. अलिकडे उद्घाटन करण्यात आलेल्या प्रोजेक्ट SU : RE विषयी खालील विधाने अभ्यासा

अ) ऑगस्ट २०१९ मध्ये मुंबई येथे या प्रोजेक्ट उदघाटन झाले

ब) या प्रोजेक्टद्वारे सार्वजनिक ठिकाणच्या दुकानांमध्ये स्वच्छ व सुरक्षित अन्नपदार्थ पुरवले जातील यावर भर देण्यात येणार आहे

पर्यायी उत्तरे :

१) फक्त अ बरोबर २) फक्त ब बरोबर ३) अ, ब बरोबर ४) कोणतेही नाही

९२. धोकाग्रस्त प्रजातींच्या आंतरराष्ट्रीय व्यापार करारावरील १८ व्या परिषदेचे (CITES Cop – 18) आयोजन खालीलपैकी कोठे करण्यात आले होते ?

१) जिनीव्हा २) न्यूयॉर्क ३) पॅरीस ४) सिंगापूर

९३. खालील विधानांचा अभ्यास करा

अ) अभिनेते महेश कोठारे राज्यात स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण)चे ब्रॅड अम्बेसिडर म्हणून कार्य करणार आहेत

ब) २ ऑक्टोबर २०१४ रोजी स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) या कार्यक्रमाची सुरूवात झाली

क) १८ एप्रिल २०१८ रोजी ग्रामीण महाराष्ट्र हागणदारी मुक्त घोषित करण्यात आला होता

पर्यायी उत्तरे :

१) फक्त अ बरोबर २) फक्त अ, ब बरोबर

३) फक्त ब, क बरोबर ४) वरील सर्व बरोबर

९४. अयोग्य जोडी ओळखा (स्वच्छ भारत पुरस्कार २०१९)

१) बेस्ट आयकॉनिक प्लेस पुरस्कार – माता वैष्णोदेवी श्राईन बोर्ड

२) स्वच्छ कृती योजना सर्वोत्कृष्ट मंत्रालय – संरक्षण मंत्रालय

३) स्वच्छ पंधरवाडा पुरस्कार – संरक्षण विभाग

४) हागणदारी मुक्त व वर्तणुकीत बदल पुरस्कार – गुजरात व सिक्कीम राज्य

९५. खालील विधानांचा विचार करा

अ) देशातील पहिल्या हेलिकॉप्टर शिखर परिषदेचे देहरादून येथे आयोजन करण्यात आले

ब) झारखंडमधील साहिबगंज येथे देशातील पहिल्या नदीवरील मल्टी – मोडल टर्मिनलचे उद्घाटन करण्यात आले

पर्यायी उत्तरे :

१) फक्त अ बरोबर २) फक्त ब बरोबर ३) अ, ब बरोबर ४) दोन्हीही चूक

www.spandancareers.org

**९६.** अयोग्य जोडी ओळखा.

| युध्द सराव | | देश/संघटना |
|---|---|---|
| १) AUMX | – | आसियान – अमेरिका |
| २) नसीम अल – बहर | – | भारत – ओमान |
| ३) मैनामती मैत्री – २०१९ | – | भारत – बांग्लादेश |
| ४) दस्तलिक | – | भारत – कझाकिस्तान |

**९७.** खालील विधाने अभ्यासा

अ) भारताने अमेरिकेसोबत Apache AH – 64E हेलिकॉप्टर्सच्या तंत्रज्ञान हस्तांतरणाबाबत करार केला असून त्यानुसार ही हेलिकॉप्टर्स आता भारतात निर्माण करण्यात येणार आहेत

ब) Apache AH – 64E हेलिकॉप्टरला 'फ्लाईग टॅक' असे संबोधले जाते

क) हे हेलिकॉप्टर अवजड लष्करी वाहनेही वाहून नेऊ शकते

वरीलपैकी योग्य विधाने ओळखा

१) फक्त अ, ब २) फक्त ब ३) फक्त अ, क ४) अ, ब, क

**९८.** अयोग्य जोडी ओळखा

| पुस्तक | लेखक/अनुवादक |
|---|---|
| १) Being Gandhi | : पारो आनंद |
| २) The Diary of Manu Gandhi | : त्रिदिप सुहद |
| ३) Bapu – My Mother | : गोपालकृष्ण गांधी |
| ४) 150 Years of Celevrating the Mahatma – the South African Legacy | : फकीर हसेन |

**९९.** या पुस्काविषयी खालील विधानांचा विचार करा

अ) गांधीवादी बौध्दिक परंपरा समजून घेणारे अभ्यासक त्रिदीप सुहद यांनी या पुस्तकाचे संपादन आणि भाषांतर केले आहे

ब) हे पुस्तक मुलत : गुजराती भाषेत लिहिलेले आहे

क) नॅशनल अर्काईव्ह ऑफ इंडिया आणि ऑक्सफर्ड प्रेस यांनी संयुक्तपणे या पुस्तकाचे प्रकाशन केले आहे

ड) मनू गांधी या महात्मा गांधी यांच्या कन्या होत्या

वरीलपैकी सत्य विधाने ओळखा

१) फक्त अ, ब २) फक्त अ, क, ड

३) फक्त अ, ब, क ४) वरीलपैकी सर्व

**१००.** २०१९ चा डुरंड चषक खालीलपैकी कोणत्या संघाने जिंकला ?

१) गोकुळम केरळ २) चेन्नई सि.टी.एफ.सी.

३) मोहन बागान ४) रिअल काश्मीर

www.spandancareers.org